# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा

अर्थसंकल्पीय मा. स्थायी समिती सभा दि. 09/03/2026 रोजी आयोजित केली होती. सदर सभा तहकूब होऊन ती दि. 16/03/2026 रोजी विचार विनिमय करुन शिफारस करणेसाठी पुन्हा बोलविण्यात आली. सदर सभेचा ठराव.

ठराव क्र. ०२ — दिनांक १६/३/ 2026

---

**प्रस्तावाचा विषय** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण,कर्जनिधी व विशेष योजनेसह अ व क अंदाजपत्रकाचे सन 2025-26 चे सुधारित व सन 2026-27 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 मधील तरतुदीप्रमाणे सविस्तर विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने सन 2025-26 च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन 2026-27 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणेसाठी ,पी बजेट चे अंदाज, जेंडर बजेटचे अंदाज, दिव्यांग कल्याण योजना व विशेष नियोजन प्राधिकरण अंदाज यासह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प ,जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प,वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/अमृत योजना विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली तपशीलवार माहिती , अंदाज व प्रस्ताव विचारात घेण्यास शिफारस केली आहे.

**निर्णय** :- पी बजेट ,जेंडर बजेट व दिव्यांग कल्याण, विशेष नियोजन प्राधिकरण अंदाज बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प , जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प ,कर्ज निधी अर्थसंकल्प , सॅटेलाईट सिटी/अमृत योजना/विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन 2025-26 चे सुधारित अंदाज व सन 2026-27 चा मुळ अंदाज तयार करताना मा. स्थायी समितीने दि. 9/03/2026 ते दि. 16/03/2026 या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

**सन 2025/26 च्या सुधारीत अर्थसंकल्पात खालील लेखाशिर्षांतर्गत तरतुदी मध्ये बदल करण्यात आले.**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | प्रस्तावित केलेली रक्कम | दुरुस्ती नंतर होणारी रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | नगर रचना विभाग विकास निधी (आकार) जमा | 6000.00 | 6500.00 |
| 2 | नगर रचना विभाग बांधकाम नियमित करणे (कंपाऊंडींग चार्जेस, दंड इ.) जमा | 1000.00 | 2500.00 |
| 3 | सा.प्र. स्टेशनरी छपाई | 316.69 | 350.00 |
| 4 | सा.प्र. फर्निचर / वॉटर कुलर | 28.91 | 35.00 |
| 5 | सा.प्र. वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती/मेडीक्लेम पॉलिसी | 65.00 | 100.00 |
| 6 | मा.तं.वि. संगणकिय पध्दतीने अभिलेख व्यवस्थापन | 309.67 | 500.00 |
| 7 | दिवे व इतर वस्तु यांची खरेदी दुरुस्ती, लेबर चार्ज व इतर चार्ज, मोटर पंप, फॅन एल.ई.डी. दुरुस्ती देखभाल | 700.00 | 1300.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | अग्निशमन वाहन दुरुस्ती निगा/ कटर मशिन दुरुस्ती निगा | 142.87 | 170.00 |
| 9 | अग्निशमन सप्ताह | 4.88 | 10.00 |
| 10 | घनकचरा व्यवस्थापन योजना अंमलबजावणीकामी सल्लागार नेमणूकीसह इतर महसुली | 11.60 | 15.00 |
| 11 | सार्वजनिक शौचालय/मुतारी साफसफाई व देखभाल | 88.44 | 110.00 |
| 12 | दहन दफन भुमी सुरक्षा रक्षकासह देखभाल | 620.00 | 650.00 |
| 13 | सांस्कृतिक भवन / समाज मंदिर दुरुस्ती | 0.00 | 10.00 |
| 14 | तलाव व्यवस्थापन कारंजा दुरुस्ती | 0.00 | 10.00 |
| 15 | रात्र निवारा शेड | 72.00 | 75.00 |
| 16 | राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना अनुदानासह महानगरपालिका अंशदानातून तलाव सुशोभिकरण करणे | 1313.33 | 1450.00 |
| 17 | उद्यान कारंजे / बाकडे खरेदी | 100.00 | 300.00 |
| 18 | लॅन्ड अॅन्ड इस्टेट मॅनेजमेंट सॉफ्टवेअर विकसित करणे. | 0.00 | 150.00 |
| 19 | वि.नि.अं. उद्यान विकास | 224.07 | 300.00 |
| 20 | वि.नि.अं. आवश्यक तेथे शित गृहासह बहुउद्देशिय मार्केट व इतर आवश्यक ठिकाणी छोटे मार्केट बांधकाम | 209.61 | 370.00 |
| 21 | शवविच्छेदनगृह, शवागृह/ मॉरचुरी व्यवस्था | 0.00 | 4.00 |
| 22 | वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती | 0.00 | 1.00 |
| 23 | उसगाव योजना विद्युत खर्च | 261.00 | 280.00 |
| 24 | सुर्या योजना विद्युत खर्च | 3500.00 | 3505.00 |
| 25 | मुख्य मलनि:स्सारण वाहिनीला इमारतीच्या मलनि:स्सारण वाहिनीची जोडणी करणे | 0.00 | 50.00 |

**सन 2026/27 चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात खालील लेखाशिर्षांतर्गत बदल करण्यात आले.**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | प्रस्तावित केलेली रक्कम | दुरुस्ती नंतर होणारी रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | सा.प्र. सह इतर विभागांसाठी टपाल खर्च | 1.00 | 6.00 |
| 2 | न.स.वि. सदस्य मानधन | 100.00 | 160.00 |
| 3 | न.र. वि.जी.आय.एस.मॅपिंग/लॅन्ड युज अपडेशन/ सि.आर.झेड सर्व्हे/ कन्स्ट्रेट मार्किंग | 8.00 | 800.00 |
| 4 | जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र बांधकाम | 50.00 | 100.00 |
| 5 | रस्ता बांधकामे | 12500.00 | 14500.00 |
| 6 | यु.आय.डी.एस.एस.टी./यु.आ.डी.एस. एस.टी योजनेअंतर्गत भुयारी गटार सॅनिटरी लॅन्डफिल साईट योजना खर्च | 5000.00 | 2400.00 |

प्रस्तावाचे वाचन करतांना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्ती करण्यात आले.

विकास कामांव्यतिरिक्त प्रभाग समिती स्तरावरुन केल्या जाणाऱ्या व्यवहारासाठी विविध लेखाशिर्षंतर्गत उपलब्ध असणा-या तरतुंदी सद्यस्थितीत समप्रमाणात विभागणी करुन नियंत्रण ठेवणेत यावे व आवश्यकतुनसार मा. आयुक्त सो. यांचे निर्देशाने त्या-त्या लेखाशिर्षांतर्गत एकूण तरतुदीच्या मर्यादेत प्रभागांतर्गत फेरफार करणे विशेष बाब म्हणून अनुज्ञेय राहील.

उपरोक्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणुस शिफारस केलेल्या सन 2025-26 चे सुधारीत अर्थसंकल्प व सन 2026-27 चे मुळ पी बजेट ,जेंडर बजेट व दिव्यांग कल्याण, विशेष नियोजन प्राधिकरण अंदाज बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प , जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प ,कर्ज निधी अर्थसंकल्प , सॅटेलाईट सिटी/अमृत योजना/विशेष निधी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

| लेखाशिर्ष | सुधारित अर्थसंकल्प सन 2025-26 | मुळ अर्थसंकल्प सन 2026-27 |
|---|---|---|
| **प्रारंभिक शिल्लक** | 854.21 | 735.40 |
| **जमा रक्कमा** | 2360.50 | 3475.82 |
| **प्रारंभिक शिल्लकेसह एकूण जमा रक्कमा** | 3214.71 | 4211.22 |
| **खर्च रक्कमा** | 2479.31 | 4209.94 |
| **अखेर शिल्लक** | 735.40 | 1.28 |

सुचकाचे नाव :- नरेंद्र पाटील
व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- ॲड. दर्शना त्रिपाठी-कोटक
व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या :- –    प्रतिकुल संख्या :- –    तटस्थ संख्या :- –

ठराव सर्वानुमते मंजूर

(प्रविण शेट्टी)
सभापती तथा पिठासीन प्राधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा. स्थायी समिती विशेष सभा**

**सूचना क्र.०३**

**दि.२३/०३/२०२६**

प्रति,
सन्मा. श्री / श्रीमती ..........................................
स्थायी समिती सदस्य / सदस्या,
वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.स्थायी समिती विशेष सभा बुधवार, दि.२५/०३/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता **'मा.स्थायी समिती सभागृह'**, ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयावर निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर विशेष सभेस कृपया हजर रहावे हि विनंती.

**<u>मा.स्थायी समिती विशेष सभा विषय पत्रिका</u>**

१. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात वैद्यकीय सेवा पुरविणेकामी स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) यांना तात्पुरत्या स्वरुपात मानद (Honorary) तत्वावर नियुक्त करणेस येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
२. वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरिनेशन, पी.ए.सी. व क्लोरीन निष्क्रियीकरण (Neutralisation) यंत्रणेची दुरुस्ती करणे कामी येणा-या अपेक्षित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
३. महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (एच) नवघर-माणिकपूर मधील शुटींग रेंजचे व्यवस्थापन करणेकामी स्वारस्याची अभिरुची (EOI)/ इ-लिलाव (E-Auction) साठी मान्यता मिळणेबाबत.
४. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. (जुने) ८८, ९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव पूर्व वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.
५. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरगाव उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.
६. वसई-विरार शहर महानगरपालिकेतील संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर, इतर संगणकीय साहित्यांची देखभाल दुरुस्ती करणेकरिता १ वर्षाकरिता GEM पोर्टल वर निविदा प्रक्रिया राबवून एजन्सी निश्चित करणेकामीच्या निविदेतील लघुत्तम निविदाकाराचे दर मंजूर करुन करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.
७. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.(जुना) १११ मधील नायगांव कोळीवाडा येथे समाजमंदीराचे बांधकाम करणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

(मा.सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

(१)

मुख्य कार्यालय, विरार

## मा. स्थायी समिती सभा

प्रस्ताव ठराव क्र. ०४ दिनांक : २५/ ०३/२०२६

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात वैद्यकीय सेवा पुरविणेकामी स्त्रीरोग तज्ञ (Gynecologist) यांना तात्पुरत्या स्वरुपात मानद (Honorary) तत्वावर नियुक्त करणेस येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा. आयुक्त सो. यांनी दि.२२/०१/२०२६ रोजी मानद तत्वावर वैद्यकीय सेवा देणेकामी डॉक्टरांची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत निर्देश देण्यात आले होते.

जावक क्र.वविशम/वैआवि/३०२१/२०२६ दि.२९/०१/२०२६ अन्वये दै. चौफेर संघर्ष व दै. महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रामध्ये दि.३०/०१/२०२६ रोजी महानगरपालिकेची जुचंद्र सामान्य रुग्णालय, बोळींज सामान्य रुग्णालय, विजयनगर-तुळींज रुग्णालय, सोपारा सामान्य रुग्णालय व माताबाल संगोपन केंद्र, सर्वोदय वसाहत येथे मानद तत्वावर वैद्यकीय अधिकारी- स्त्रीरोग तज्ञ यांचा सेवा घेणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी दि.०२/०२/२०२६ रोजी अर्ज सादर केले आहेत. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अर्ज क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | डॉ. आशिष दिलीप सोनवणे | एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. |
| २ | डॉ. वृषाली देवेंद्र गुप्ता | एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. |
| ३ | डॉ. धवल प्रकाश कोंडकर | एम.बी.बी.एस., एम.एस.(ऑब्स्ट अॅण्ड गायनॅक) |
| ४ | डॉ. स्नेहा अनिंद्य सेनचौधरी | एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. |
| ५ | डॉ. प्रेरणा अंकित पटेल | एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. |

सबब महानगरपालिकेच्या उपरोक्त रुग्णालयासाठी स्त्रीरोग तज्ञ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांची नितांत गरज असल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरुपात मानद (Honorary) तत्वावर घेतल्यास महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरीकांना/रुग्णांना लाभ होणार आहे. मा. सर्वसाधारण सभा दि.१७/०१/२०१९ ठराव क्र.२२ अन्वये रुग्णांकडुन आकारण्यात येणारी फी रद्द करुन वैद्यकीय सेवा विनामूल्य पुरविण्यात येते.

सदर मानद डॉक्टरांना मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.२६, मा. सर्वसाधारण सभा दि.१८/११/२०१६ ठराव क्र.१३, मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०४/२०१५ ठराव क्र.२९ व मा. स्थायी समिती सभा दि.०५/०३/२०१९ ठराव क्र.६२६ दयावयाची फी निश्चित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे अदा करणे आवश्यक आहे.

यानुसार वरील पाच स्त्रीरोग तज्ञ यांचे करिता प्रति मासिक फी रु.४,५००/- असुन वार्षिक खर्च रु.२,७०,०००/- व इतर कामाचे मानधन (शस्त्रक्रिया फी, आंतर रुग्ण, बाहय रुग्ण तपासणी फी) अदा केल्यास अंदाजे वार्षिक रु.१०,००,०००/- असे एकूण खर्च रक्कम रु.१२,७०,०००/- अपेक्षित आहे.

उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांना महानगरपालिकेत मानद (Honorary) तत्वावर घेतल्यास वार्षिक खर्च अंदाजे रु.१२,७०,०००/- अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात **"ऑपरेशन चार्जेस, लॅब चार्जेस, सोनोग्राफी व एक्स-रे चार्जेस"** या लेखाशिर्षाखाली रु.१,२५,००,०००/- इतकी तरतुद असल्याने या लेखाशिर्षाखाली सदरचा मानधनापोटी येणारा खर्च तरतुदीमधुन करण्यात येईल.

सबब यानुसार उपरोक्त तक्त्यातील अनु. क्र. १ ते ५ मधील नमूद डॉक्टरांना मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविणेकामी तज्ञ डॉक्टर म्हणून नेमणूक करणे योग्य होईल व त्यांना मासिक रु.४,५००/- इतक्या मानधन तत्वावर नियुक्त करणेस व त्यांनी केलेल्या कामाची होणारी बाहयरुग्ण तपासणी,

आंतररुग्ण तपासणी फी व शस्त्रक्रिया फी निश्चित केलेल्या दरानुसार अदा करणेकामी येणाऱ्या एकत्रित अंदाजे रक्कम रु.१२,७०,०००/- इतका वार्षिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव योग्य त्या निर्णयासाठी व मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवणेस शिफारस आहे.

**ठराव/निर्णय** :- उक्त प्रस्ताव नमूद केलेले डॉ. आशिष दिलीप सोनवणे, डॉ. वृषाली देवेंद्र गुप्ता, डॉ. धवल प्रकाश कोंडकर डॉ. स्नेहा अनिंद्य सेनचौधरी व डॉ. प्रेरणा अंकित पटेल यांना तात्पुरत्या स्वरुपात मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर म्हणून नेमणूक करणेस व त्यांना मासिक रु.४,५००/- च्या मानधन तत्वावर नियुक्त करणेस तसेच त्यांनी केलेल्या कामाची होणारी (बाहयरुग्ण तपासणी, आंतररुग्ण तपासणी फी व शस्त्रक्रिया फी) निश्चित केलेल्या दरानुसार अदा करणेकामी येणाऱ्या अंदाजे वार्षिक रक्कम रु.१२,७०,०००/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव ........रंजना भालेकर........

व स्वाक्षरी ........[signature]........

अनुमोदकाचे नाव ........नरेंद्र वसंत पाटील........

व स्वाक्षरी ........[signature]........

अनुकूल संख्या ............ प्रतिकुल संख्या ............ तटस्थ संख्या ..........

**ठराव/सर्वानुमते/ बहुमताने/ नामंजूर/मंजूर**

( [signature] )

पिठासीन अधिकारी

स्थायी समिती

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा

**प्रस्तावाचा ठराव क्र. :-** ०५ **दिनांक:-**२५ / ०३ / २०२६

---

**विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरिनेशन, पी.ए.सी. व क्लोरीन निष्क्रियीकरण (Neutralistion) यंत्रणेची दुरुस्ती करणे कामी येणा-या अपेक्षित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावित नाव** :- वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरिनेशन, पी.ए.सी. व क्लोरीन निष्क्रियीकरण (Neutralistion) यंत्रणेची दुरुस्ती करणे.

**अंदापत्रकीय रक्कम** :- **२५.०० लक्ष (१८%GST)**

**कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिकेस सुर्या योजना टप्पा १ व ३ अंतर्गत २०० द.ल.ली , उसगाव योजनेअंतर्गत २० द.ल.ली, पेल्हार योजनेअंतर्गत १० द.ल.ली. असा एकूण २३० द.ल.ली पाणी पुरवठा होत आहे.

उपरोक्त योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी निर्जतुकी करणासाठी क्लोरिन गॅस वापरण्यात येतो. सदर क्लोरिन गॅसचे डोसेज देण्याकरीता प्रत्येकी जलशुध्दीकरण केंद्रावर (१ Pre & Post) Working व (१ Pre & Post) Stand by अशी व्यवस्था आहे. सुर्या योजना टप्पा १ व ३, उसगाव योजना, पेल्हार व फुलपाडा योजनेअंतर्गत (Pre & Post) असे एकूण १४ क्लोरिनेशन युनिट आहेत. क्लोरिन गॅसच्या संपर्कामुळे क्लोरिनेशन यंत्रणेचे काही (Spares) भाग उदा. Inlet Valve, Outlet Valve हे वांरवार खराब होत असतात. पाणी शुध्दीकरणाच्या प्रक्रियेमध्ये क्लोरिनेशन यंत्रणा महत्वाची असते. त्यामुळे सदर यंत्रणेची वेळोवळी दुरुस्ती करणे आवश्यक असते.

क्लोरिन गॅस ची गळती झाल्यास क्लोरिन गॅस मानवी आरोग्यास अपायकारक व हानीकारक असतो. त्यामुळे सुर्या व उसगाव योजनेअंतर्गत धुकटण व पारोळ जलशुध्दीकरण केंद्र येथे असे एकूण ३ ठिकाणी क्लोरीन यंत्रणा सन २०१६ मध्ये बसविण्यात आली आहे. सदर यंत्रणेमध्ये क्लोरीन शोषण्याकरीता आवश्यक सोल्युशन बदलण्यात येऊन नव्याने टाकणे आवश्यक आहे. तसेच क्लोरीन निष्क्रियीकरण (Neutralistion) यंत्रणेमधील यांत्रिक व विद्युतीय नादुरुस्ती झाली असून त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सद्य:स्थितीत नविन सुर्या योजनेअंतर्गत Pre Dosing करणारे पंप वारंवार नादुरुस्त होत असून सदर पंपाच्या सहाय्याने डोसिंग व्यवस्थितरित्या होत नाही. परिणामी Aeration व Setting Tank मध्ये शेवाळ तयार होत आहे. त्यामुळे सदरचे पंप बदलणे आवश्यक आहे. तसेच जुन्या योजनेअंतर्गत Pre Dosing चे पंप बदलणे आवश्यक आहे.

पावसाळयामध्ये पाण्याची गढुळता नियंत्रीत करण्यासाठी पी.ए.सी. चा वापर करण्यात येत असून त्या करीता धुकटण जलशुध्दीकरण केंद्र येथे २ व पारोळ जलशुध्दीकरण केंद्र येथे १ अशा एकूण ३ पी.ए.सी साठवण टाक्या बांधण्यात आलेल्या आहेत. सदर टाक्यामधून केमीक्ल पंपाव्दारे पी.ए.सी. ची आवश्यक डोसिंग करण्यात येते. सद्य:स्थितीत नमूद तीनही ठिकाणी प्रत्येकी एकच पंप असल्याकारणाने
त्यामध्ये बिघाड झाल्यास गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तीनही ठिकाणी पर्यायी व्यवस्था (Stand By) करिता केमिकल् पंप बसविणे आवश्यक आहे.

सदर कामाचे दर मजीप्राच्या दरसुची मध्ये उपलब्ध नाही. त्याकरीता सदर कामी बाजारभाव मागविले असता रक्कम रु. २५ लक्ष (GST सह) खर्च अपेक्षित असुन "**सुर्या योजना देखभाल दुरूस्ती**" या लेखाशिर्षामधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामी बी/२ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

**लेखाशिर्ष व तरतूद** :- **" सुर्या योजना देखभाल दुरूस्ती "**

तरी वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरिनेशन, पी.ए.सी. व क्लोरीन निष्क्रियीकरण (Neutralistion) यंत्रणेची दुरुस्ती करणे कामी बी/२ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक खर्चास प्रशासकिय व वित्तीय मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे सविनय सादर.

---

**ठराव / निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरिनेशन,पी.ए.सी. व क्लोरीन निष्क्रियीकरण (Neutralistion) यंत्रणेची दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचकाचे नाव** - पंकज पाटील

**व स्वाक्षरी** -

**अनुमोदकाचे नाव** - स्वप्नील कवळी

**व स्वाक्षरी** -

**अनुकुल संख्या - ................ प्रतिकुल संख्या - ................. तटस्थ संख्या - ..................**

***ठराव / सर्वानुमते / बहुमताने / मंजुर / नामंजुर**

**(प्रवीण शेट्टी)**
सभापती तथा पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका,**
**मुख्यालय,विरार (प.)**
**मा.स्थायी समिती सभा**

ठराव क्र. ०६ | दिनांक २५/०३/२०२६

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (एच) नवघर-माणिकपूर मधील शुटींग रेंजचे व्यवस्थापन करणेकामी स्वारस्याची अभिरुची (EOI)/ इ-लिलाव (E-Auction) साठी मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील तसेच इतर परिक्षेत्रातील विद्यार्थी / खेळांडू यांचा सर्वांगिण विकास व्हावा, शिक्षण ज्ञानाबरोबर यांच्यातील सुप्त कला गुणांना वाव मिळावा, कलात्मक क्षमता विकसीत होण्यासाठी योग्य वातावरण, संधी आणि प्रोत्साहन मिळावे तसेच शारिरिक व बौद्धिक विकास व्हावा हे उद्दिष्ठ समोर ठेवून महानगरपालिकेने प्रभाग समिती (एच) नवघर-माणिकपूर येथील दिवाणमान, अंबाडी रोड, तरणतलाव इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर सुसज्ज शुटींग रेंज उभारण्यात आली आहे. त्यात वापरण्यात येणारे बरेचसे साहित्य (उदा.रायफल गन, इलेक्ट्रोनिक गन, पिस्तुल इ.) हे सुद्धा महानगरपालिकेच्या मालकीचे आहे.

प्रभाग समिती - एच, नवघर माणिकपूर अंतर्गत बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३३ दि.१३/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली असून पुढील निविदा कार्यवाहीसाठी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार जावक.क्र.वविशम/शअ/बांध/१७०/१९ दि.०८/०७/२०१९ ई-निविदा सूचना दि.०९/०७/२०१९ च्या दै.मिड-डे, दै.प्रात:काल, दै.प्रहार व दै.सकाळ या वृत्तपत्रात जाहिरात देवून ई-निविदा मागविण्यात आली होती.

सदर ई-निविदेमध्ये ३ निविदाधारकांनी सहभाग घेतला होता. प्राप्त निविदांपैकी तीनही निविदाधारक पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदाधारक मे.लक्ष शुटींग क्लब यांची निविदा मंजूर केली होती. त्यानुसार जावक क्र.वविशम/४८६/१९-२० दि.१९/०९/२०१९ अन्वये मे.लक्ष शुटींग क्लब यांस दिवाणमान तरणतलाव इमारत दुसऱ्या मजल्यावर तयार करण्यात आलेल्या शुटींगरेंजचे व्यवस्थापनाचे काम करारनाम्यातील अटींच्या अधिन राहून करण्याचे कार्यादेश देण्यात आले होते.

तद्नंतर मे.लक्ष शुटींग क्लब यांची कामाची मुदत दि.१९/०९/२०२४ रोजी संपली असल्याने प्रशासकीय ठराव क्र.८५५ दि.२३/०६/२०२५ अन्वये दिवाणमान तरणतलाव इमारत दुसरा मजल्यावर तयार करण्यात आलेले शुटींग रेंजचे व्यवस्थापन करणेकामी दि.३०/०८/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच ठेकेदाराचे मंजूर रक्कम रु.१७,०५,०००/- इतक्या खर्चास मा.प्रशासकीय ठराव क्र.८५५, दि.२३/०६/२०२५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती.

त्यानंतर शुटींग रेंज व्यवस्थापन करणेकामी प्रभाग समितीने कोणत्याही प्रकारची ई-निविदाची प्रक्रिया केलेली नाही.

तथापि, महानगरपालिकेच्या क्रीडा विभाग मुख्यालयामार्फत प्रभाग समिती (एच) नवघर-माणिकपूर हद्दीतील दिवाणमान तरणतलाव इमारत दुसरा मजल्यावर तयार करण्यात आलेले शुटींग रेंजचे व्यवस्थापन करणेकामी अनुभवी प्रशिक्षक नेमणेबाबत दै.पुण्यनगरी, दै.परशुराम समाचार व दै.आमची मुंबई यावृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार पालघर तालुका रायफल क्लब यांचे कडून श्रीम.दर्शना जावळे व श्री.कैखुस्त्रो मे. इराणी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

परंतु सदर प्रस्ताव मा.मुख्य लेखापरिक्षक, मुख्यालय यांचेकडे सादर केला असता शुटींग रेंज व्यवस्थापन करणेबाबत खालीलप्रमाणे १ ते ६ मुद्दे उपस्थित केले आहे.

१. सदर योजनेचा मागील वर्षाचा जमा व खर्च नमूद करावा.
२. जागेचे भाडे व घेणे अपेक्षित रॉयल्टी किती ? या आधारावर किमान आधारभूत किंमत निश्चित करावी. बांधकाम विभागाकडून जागेचे भाडे प्रमाणपत्र घ्यावे व सदर प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थ्यांची संख्या, आकारलेले दर व होणारा खर्च याचा तुलनात्मक अभ्यास करून होणाऱ्या नफ्यातील ५० टक्के भाग रॉयल्टी म्हणून निश्चित करावा.
३. सदर कामाकरिता एजन्सी नियुक्तीबाबत जाहिरात काढणे योग्य राहील.
४. प्रशिक्षक एजन्सी मार्फतच घेणे योग्य राहील.
५. *प्रशिक्षकांना द्यावयाचा मोबदला हा सर्वतोपरी संबंधित यंत्रणा यांना देणे बंधनकारक राहील.*
६. सदर प्रकरणात महानगरपालिका केवळ जागा देईल. त्याबाबतचा संपूर्ण साहित्यावरील खर्च, मानधनाचा खर्च व इतर सर्व अनुषंगिक खर्च संबंधित यंत्रणेने करावा. महानगरपालिकेला जागाभाडे तथा रॉयल्टी पोटी रक्कम देणेबाबत कार्यवाही करावी व त्या आशयाचा ई - लिलाव करावा.

उपरोक्त मुद्दयास अनुसरुन जा.क्र.वविशम/क्रीडा/२००/२०२५-२६, दि.०६/११/२०२५ च्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती (एच) नवघर-माणिकपूर यांनी जा.क्र.वविशम/५२०७/२०२५-२६, दि.११/११/२०२५ अन्वये शुटींग रेंजची माहिती दि.१३/११/२०२५ रोजी क्रीडा विभागात सादर केलेली आहे.

सदर माहिती खालील प्रमाणे आहे.

१. शुटींग रेंज साहित्याची यादी -

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | नग |
|---|---|---|
| १ | ब्रेक बॅरल रायफल | १० |
| २ | पिस्टल ज्युनिअर | ०१ |
| ३ | पिस्टल सिनीयर | ०२ |
| ४ | इलेक्ट्रॉनिक टारगेट सिस्टम | ०८ |
| ५ | पेपर टारगेट पुली | १० |
| ६ | रायफल केस | ०५ |
| ७ | जॅकेट | ०८ |
| ८ | स्टॅण्ड | ०५ |
| ९ | शुज | ०८ |
| १० | ग्लवज | ०८ |
| ११ | निलिंग रोल | १० |
| १२ | स्कॅट | ०१ |
| १३ | ड्रायर कंप्रेसर | ०१ |
| १४ | एअर सिलेंडर | ०३ |
| १५ | मॉडल-८०० रायफल | ०२ |
| १६ | मॉडल-८०० बेसीक रायफल | ०१ |

२. शुटींग रेंज सहभागी विद्यार्थ्यांची संख्या -

| अ.क्र. | तपशील | सहभागी विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | रायफल | ३५ |
| २ | पिस्टल | १७ |
| | एकूण | ५२ |

३. शुटींग रेंज मध्ये आकारण्यात येणारे दर -

| अ.क्र. | तपशील | फी |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण प्रशिक्षण १ दिवसीय सराव | २०० |
| २ | इलेक्ट्रॉनिक शुटींगरेंज एक दिवसीय सराव | ४०० |
| ३ | मासिक शस्त्र भाडे | ३०० |
| ४ | सर्वसाधारण प्रशिक्षण मासिक शुटींग रेंज भाडे | १८०० |
| ५ | इलेक्ट्रॉनिक मासिक शुटींग रेंज भाडे | ३००० |
| ६ | ६ दिवसाचा बेसिक कोर्स | ४००० |

४. शुटींग रेंजचे वार्षिक उत्पनाचा तपशील -

| अ.क्र. | सन | एकुण वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|
| १ | सन २०२३- २०२४ | ७,२८,४००/- |
| २ | सन २०२४-२०२५ | १३,२७,८००/- |
| ३ | सन २०२५-२०२६ ( दि.०६/११/२०२५ पर्यंत) | ८,०२,४००/- |
| | एकुण रक्कम | २८,५८,६००/- |

५. शुटींग रेंज व्यवस्थापन करीता झालेल्या खर्चाचा तपशील -

| अ.क्र. | सन | एकुण झालेला खर्च |
|---|---|---|
| १ | मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३३ दि.१३/०२/२०१९ अन्वये (५ वर्षाकरिता) (कालावधी - १९/०९/२०१९ ते दि.१९/०९/२०२४ पर्यंत) | ८९,३५,४४०/- |
| २ | प्रशासकीय ठराव क्र.८५५ दि.२३/०६/२०२५ अन्वये मुदतवाढ (कालावधी - दि .२०/०९/२०२४ ते ३०/०८/२०२५ पर्यंत) | १७,०५,०००/- |
| | एकुण रक्कम | १,०६,४०,४४०/- |

शुटींग रेंज व्यवस्थापनाबाबत मागील तीन वर्षाचे उत्पन्न रु.२८,५८,६००/- पाहता खर्चाची रक्कम जास्त असल्याचे दिसून येत आहे. यापासुन वसई-विरार शहर महानगरपालिकास उत्पन्न होत नसून नुकसान होत आहे, असे दिसून येते. त्याकरिता वसई-विरार शहर महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यक असल्याने प्रभाग समिती-एच, नवघर-माणिकपूर मधील शुटींग रेंज व्यवस्थापनाबाबत स्वारस्याची अभिरुची (EOI)/इ-लिलाव (E-Auction) चा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका (VVCMC) अंतर्गत सार्वजनिक उपयोगासाठी प्रभाग समिती-एच, नवघर-माणिकपूर येथिल शुटींग रेंज कार्यरत आहेत. या शुटींग रेंज प्रभावी व्यवस्थापन, नियमित देखभाल, स्वच्छता व सुरक्षिततेची हमी तसेच आर्थिकदृष्ट्या त्यांचा चांगला वापर सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित असल्याने खाजगी संस्थांच्या सहभागातून संचालन व देखभाल आवश्यक असल्याने महानगरपालिकेचे शुटींग रेंजचे संचालन व देखभालीसाठी सन २०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८ या आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) / इ-लिलाव (E- Auction) करणेस सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावात विचार विनिमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**निर्णय / ठराव** :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (एच) नवघर-माणिकपूर मधील शुटींग रेंज व्यवस्थापन, संचालन व देखभाल करणेकामी सन २०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८ या आर्थिक वर्षाकरिता नमुद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून स्वारस्याची अभिरुची (EOI) / इ-लिलाव (E-Auction) पध्दतीने प्रस्ताव मागविणेस ही सभा मंजुरी देत आहे व त्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव – नरेंद्र वसंत पाटील

व स्वाक्षरी –

अनुमोदकाचे नाव – सुनील आचोळकर

व स्वाक्षरी

अनकूल संख्या ---------------------- प्रतिकुल संख्या ------------------------ तटस्थ संख्या----------------------

ठराव /सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं.४०१३०३**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रस्ताव ठराव क्र. ०७ | विभाग : सार्व. बांधकाम
दिनांक : २५/०३/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय:** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव पूर्व वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा क्र. | :- | |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. २६,०७,७५,६९७/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | :- | रु. २६,०७,७५,६९७/- |
| ई-निविदा रक्कम | :- | रु. ----------/- (पाईप रक्कम वगळुन) |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. १४२२ दि. १६/१०/२०२५ |
| तांत्रिक मंजुरी | :- | कार्यकारी अभियंता पृ.क्र. ----- अ. क्र. ----- दि. ३१/१०/२०२५ |
| ई -टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख | :- | वविशम/बांध/श.अ./---------/२०२३,दि. १०/११/२०२५ |
| वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि. | :- | दि. |
| वृत्तपत्राचे नांव | :- | १) दै. लोकमत, २) दै. आपला महानगर, ३) दै. परशुराम समाचार, ४) दै. जागरुक टाईम्स, ५) दै. नरविर, ६) दै. मिड डे |
| ई-टेण्डरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख | :- | दि. १०/११/२०२५ पासून ते दि. २४/११/२०२५ दु.३.०० पर्यत |
| ई-टेण्डरींगद्वारे निविदा सुचना स्विकारण्याची तारीख | :- | दि. |
| प्रथम लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. २६/११/२०२५ |
| द्वितीय लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. १२/१२/२०२५ |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा | :- | ०७ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | कार्यकारी अभियंता |

**प्राप्त निविदा समितीपुढे उघडली असुन त्यांचे दर पुढीलप्रमाणे :-**

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल |
|---|---|---|---|
| **१** | **मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन** | **(-) २०.७९% कमी दराने** | **बी.जी.क्र. 0555NDDG00157126** |
| २ | मे. राठोड भाग्यजीत ॲण्ड कंपनी | (-) १६.००% कमी दराने | - |
| ३ | मे. आर्मस्ट्रॅग इंडिया कंस्ट्रक्शन | (-) १५.३७% कमी दराने | - |
| ४ | मे. नवदीप कंस्ट्रक्शन | (-) १३.६८% कमी दराने | - |
| ५ | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रा | (-) १०.२६% कमी दराने | - |
| ६ | मे. साई गणेश एंटरप्रायझेस | (-) १०.००% कमी दराने | - |
| ७ | मे. गजानन कंस्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | - |

**उपरोक्त** तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन** यांची (-) **२०.७९% कमी** दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **२०.७९% कमी** दराची निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहेत. **मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन यांनी २०.७९% (रु. ५,४२,१५,२६८/-)** कमी दराच्या निविदेसाठी रक्कम रु. ३,७८,४७,४४९/- इतकी अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम बँक गॅरेंटी **बी.जी.क्र.** 0555NDDG00157126 ने सादर केलेली आहे.

दि. / /२०२६ रोजी अन्वये मा. स्थायी समितीने **मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन** यांच्या **२०.७९% कमी** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस करणेत आली आहे.

तरी **मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय** दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) / ७३(ड) अन्वये मा. स्थायी समितीपुढे संविदा करणेकरीता मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव / निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील **प्रभाग समिती "जी" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव पूर्व वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे** कामी प्राप्त निविदांपैकी **मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **२०.७९% कमी** दराने निविदाही सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) / ७३(ड) अन्वये संविदा करणेस तसेच त्याअनुषंगाने होणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाचे नांव : नरेंद्र वसंत पाटील

व स्वाक्षरी ____________

अनुमोदकाचे नांव : सुशील आचोळकर

व स्वाक्षरी ____________

अनुकुल संख्या ________ प्रतिकुल संख्या ________ तटस्थ संख्या ________

ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजुर/नामंजुर

प्रविण चिन्मया शेट्टी
सभापती तथा पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
वसई-विरार शहर महानगरपालिका

* (आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई - विरार शहर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा

**प्रस्तावाचा ठराव क्र. :-** ०८ **दिनांक:-** २५/०३/ २०२६

---

**कामाचे नाव :-** सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरगाव उद्धव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.
(Tender Id. 2025 _VVCMC_1244370_1)

| | | |
|---|---|---|
| **लेखाशिर्ष** | :- | **"उसगाव योजना देखभाल दुरुस्ती "** |
| **योजनेचे नाव** | :- | **उसगाव योजना** |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु.४५ लक्ष (GST सह) |
| तांत्रिक मान्यता रक्कम | :- | रु.४५ लक्ष (GST सह) |
| निविदा रक्कम | :- | रु.४५ लक्ष (GST सह) |
| प्रशासकीय मान्यता आदेश /ठराव क्र दिनांक | :- | ठराव क्र. १४१३ दि. १६/१०/२०२५ |
| प्रशासकीय मान्यतेची रक्कम | :- | रु.४५ लक्ष (GST सह) |
| तांत्रिक मान्यता क्र. | :- | W/S २/१० दि.:- १७/१०/२०२५ |
| ई - निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | :- | दि. २९/१०/२०२५ |
| वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक | :- | ०३/११/२०२५ ०८ दिवस |
| वृत्तपत्रांची नावे | :- | १) दै. महाराष्ट्र टाईम्स २) आमची मुंबई ३) आपल महानगर |
| ई-निविदा प्रसिध्दी | :- | दि. ०३/११/२०२५ वेळ ३.०० पासून ते दि. १०/११/२०२५ वेळ. ३.०१ पर्यंत |
| व्दितीय वेळ ई - निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | :- | दि. ११/११/२०२५ |
| व्दितीय वेळ वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक / | :- | दि. १३/११/२०२५ ०७ दिवस |
| व्दितीय वेळ ई-निविदा प्रसिध्दी | | १) दै. महाराष्ट्र टाईम्स २) आमची मुंबई ३) आपल महानगर |
| वृत्तपत्रांची नावे | :- | दि. १३/११/२०२५ वेळ ३.०० पासून ते दि. २०/११/२०२५ वेळ. ३.०१ पर्यंत |
| ई - निविदाव्दारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या | :- | ०२ |
| प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक | :- | दि. २५/११/२०२५ |
| व्दितीय लिफाफा उघडल्याची दिनांक | :- | दि. ३०/१२/२०२५ |
| पात्र निविदा संख्या | :- | ०२ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | प्र. कार्यकारी अभियंता |

## प्राप्त दर

| अ. क्र. | निविदाकार | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटी बाबत धनाकर्ष तपशील | एल १, एल २, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करून नोंदवावा | एल १ चा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन | (+) ५.००% जादा दराने | - | एल १ | वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.५०% कमी दराने |
| २ | मे. आर.जी. कंन्स्ट्रक्शन | (+) ७.००% जादा दराने | - | एल २ | |

उपरोक्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दराचा विचार करता लघूत्तम दर (एल - १) मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन हे निविदाधारक ठरत असून सदरचा दर महानगरपालिकेस जास्त वाटत असल्याने जा.क्र. व.वि.श.म./ पा.पु./ ११२५/२०२५ दि.३०/१२/२०२५ अन्वये वाटाघाटी करिता निमंत्रित करण्यात आले होते. मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांनी दि. ०२/०१/२०२६ रोजी सदरचा देकार कमी करण्यात येऊन वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.५०% कमी दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. वाटाघाटीअंती प्राप्त लघूत्तम दरास निविदा समितीने दि. १८/०२/२०२६ रोजीच्या बैठकीत मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.५०% कमी दराच्या निविदेसमवेत संविदा करण्यास व त्याअनुषंगाने मंजूर दरानुसार येणाऱ्या रक्कम रू. ४४,७७,५००/- (GST सह) खर्चास वित्तीय मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर सविनव सादर.

---

**ठराव / निर्णय** :- विषयांकीत कामी मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.५०% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**सुचकाचे नाव** - सुनील आचोळकर

**व स्वाक्षरी** -

**अनुमोदकाचे नाव** - नरेंद्र वसंत पाटील

**व स्वाक्षरी** -

**अनुकुल संख्या - ................ प्रतिकुल संख्या - .................. तटस्थ संख्या - ..................**

***ठराव / सर्वानुमते / बहुमताने / मंजुर / नामंजुर**

**(प्रवीण शेट्टी)**
सभापती तथा पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, विरार
## स्थायी समिती

ठराव क्र. ०९ ------------ दिनांक :- २५/ ०३ /२०२६

---

विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर, इतर संगणकीय साहित्यांची देखभाल दुरुस्ती करणेकरिता १ वर्षाकरिता GEM पोर्टल वर निविदा प्रक्रिया राबवून एजन्सी निश्चित करणेकामीच्या निविदेतील लघुत्तम निविदाकाराचे दर मंजूर करुन करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेतील संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर, इतर संगणकीय साहित्यांची देखभाल दुरुस्ती करणेकरिता १ वर्षाकरिता GEM पोर्टल वर निविदा प्रक्रिया राबवून एजन्सी निश्चित करुन खरेदी करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. १७७८ दिनांक. ११/१२/२०२५ रोजी अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने GEM पोर्टलवर दि.१५/१२/२०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करुन दि. १५/१२/२०२५ ते दि. २५/१२/२०२५ या कालावधीत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत निविदेसाठी एकुण ३ निविदाकांरानी सहभाग घेतला आहे. निविदेतील सहभाग घेतलेल्या ३ निविदाकरांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता पुर्ण केली असून सदर ३ निविदाकांरास पात्र करुन निविदेचा लखोटा क्र. २ उघडणेकामी मा. निविदा समिती दि. १८/०२/२०२६ रोजी मंजूरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने निविदाधारकांचे क्र. २ चे वित्तीय बाबींचे लिफाफे दि. १८/०२/२०२६ रोजी उघडण्यात आले असून निविदेतील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकार | निविदा दर | एल१, एल२, एल३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करुन नोंदवावा |
|---|---|---|---|
| १ | **Radhika Enterprises** | **१०१५९८०.००** | **L१** |
| २ | R D Data Systems | १६०७६५९.२० | L२ |
| ३ | Puthor Infotech Pvt Ltd | १६८५०४०.१४ | L३ |

तसेच L१ निविदाकार मे. Radhika Enterprises यांचे साहित्य निहाय प्राप्त दरांचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | तपशिल | नग | प्रति नग रक्कम (सर्व करांसहीत) | टॅक्स (%) | एकुण रक्कम (सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dell OptiPlex 3040 | 4 | 1606.34 | 289.14 | 7581.92 |
| 2 | Dell OptiPlex 3050 | 5 | 1606.34 | 289.14 | 9477.41 |
| 3 | Dell OptiPlex 3060 | 4 | 1606.34 | 289.14 | 7581.92 |
| 4 | Dell vostro 3050 | 4 | 1606.34 | 289.14 | 7581.92 |
| 5 | Dell vostro 3268 | 23 | 1606.34 | 289.14 | 43596.07 |
| 6 | Dell Vostro 3470 | 22 | 1606.34 | 289.14 | 41700.59 |
| 7 | Dell Vostro 3471 | 74 | 1606.34 | 289.14 | 140265.61 |
| 8 | Dell vostro 3681 | 36 | 1606.34 | 289.14 | 68237.32 |
| 9 | Hp 280 G4 Micro tower | 4 | 1606.34 | 289.14 | 7581.92 |
| 10 | HP Pro 200 G4 All-in-One PC | 32 | 1606.34 | 289.14 | 60655.40 |
| 11 | HP PRO DESK 600 G2SFF | 4 | 1606.34 | 289.14 | 7581.92 |
| 12 | Hp slim desktop s01 -pf2428in | 23 | 1606.34 | 289.14 | 43596.07 |
| 13 | Hp slim Desktop S01 -pf2445in | 6 | 1606.34 | 289.14 | 11372.89 |
| 14 | Hp slim desktop s01- pf2567in | 30 | 1606.34 | 289.14 | 56864.44 |
| 15 | Lenovo V530S | 16 | 1606.34 | 289.14 | 30327.70 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16 | Lenovo Idea Centre 3-07IMB05 Desktop | 13 | 1606.34 | 289.14 | 24641.26 |
| 17 | Lenovo(All in One) | 12 | 1606.34 | 289.14 | 22745.77 |
| | **Printer Model** | | | | |
| 1 | CANON LBP2900B | 65 | 1606.34 | 289.14 | 123206.28 |
| 2 | HP LASERJET P1108 | 35 | 1606.35 | 289.14 | 66342.26 |
| 3 | CANON IMAGECLASS LBP 6030B | 24 | 1606.35 | 289.14 | 45491.83 |
| 4 | HP LASERJET 108A | 17 | 1606.35 | 289.14 | 32223.38 |
| 5 | HP LASERJET 1020 PLUS | 43 | 1606.35 | 289.14 | 81506.20 |
| 6 | Canon image CLASS MF272dw | 14 | 1606.35 | 289.14 | 26536.90 |
| 7 | CANON G4770 | 3 | 1606.35 | 289.14 | 5686.48 |
| 8 | HP LaserJet P1008 | 3 | 1606.35 | 289.14 | 5686.48 |
| 9 | Canon PIXMA G4010 | 10 | 1606.35 | 289.14 | 18954.93 |
| 10 | Epson Eco Tank Monochrome M2140 | 4 | 1606.35 | 289.14 | 7581.97 |
| 11 | HP Laser jet Pro M1136 | 2 | 1606.35 | 289.14 | 3790.99 |
| 12 | HP Smart Tank 530 | 4 | 1606.35 | 289.14 | 7581.97 |
| | | **एकुण** | | | **1015980.00** |

उपरोक्त प्रमाणे लघुत्तम निविदाकार मे. Radhika Enterprises यांची लघुत्तम निविदा व प्राप्त एकुण दर रक्कम रु. १०,१५,९८०/- मंजूर करुन संविदा करणेकामी मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस आहे.

**प्रस्तावाचा निर्णय** :- सदर बाबत सभागृहात चर्चा करण्यात आली. वसई विरार शहर महानगरपालिकेतील संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर, इतर संगणकीय साहित्यांची देखभाल दुरुस्ती करणेकामीच्या निविदेतील प्राप्त लघुत्तम निविदाकार मे. Radhika Enterprises यांचे दर मंजूर करुन १ वर्षाकरीता होणाऱ्या रक्कम रु. १०,१५,९८०/- इतक्या खर्चास व निविदाकारासोबत संविदा करणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :- लॉरेल डायस

स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- सुनील आचोळकर

स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या---------------------- प्रतिकुल संख्या --------------------------- तटस्थ संख्या ----------------------

(ठराव/सर्वानुमते/बहूमताने/मंजूर/नामंजूर)

(श्री. प्रविण शेट्टी)
सभापती तथा पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
वसई विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं.४०१३०३**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रस्ताव ठराव क्र. ९०

विभाग : सार्व. बांधकाम
दिनांक : २५/०३/२०२६

**प्रस्तावाचा विषय:** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. १११ मधील नायगांव कोळीवाडा येथे समाजमंदीराचे बांधकाम करणे** याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा क्र. | : | २०२४_VVCMC_१०५५५३३_९ |
| लेखाशिर्ष | : | १) स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत कामे (आमदार निधी कामे)<br>२) विकास निधी अंतर्गत नाट्यगृहे, सभागृह बांधकाम |
| योजनेचे नांव | : | आमदार फंडातर्गत योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु. ५८,४०,१७६/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | : | रु. ५८,४०,१७६/- |
| निविदा रक्कम | : | रु. ५८,४०,१७६/- |
| प्रशासकीय मान्यता आदेश/ ठराव क्र. | : | मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. ३१५६ दि. १६/०२/२०२४ |
| प्रशासकीय मान्यतेची रक्कम | : | रु. ५८,४०,१७६/- |
| तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक | : | कार्यकारी अभियंता पृ.क्र. १८ अ.क्र. ११९ दि. २८/०२/२०२४ |
| ई-निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | : | वविशम/बांध/३३८/२०२४-२५ दि. १६/०७/२०२४ |
| वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक | : | दि. १७/०७/२०२४ |
| कालावधी | : | ०६ महीने |
| वृत्तपत्रांची नांवे | : | १) दै. लोकसत्ता २) दै. सामना<br>३) दै. जागल्या ४) दै. हमारा महानगर<br>५) दै. प्रात:काल ६) दै. द फ्रि प्रेस जर्नल<br>७) दै. द इंडीयन एक्सप्रेस |
| ई निविदा प्रसिध्दी | : | दि. १९/०७/२०२४ दु.३.०० पासुन ते दि. २६/०७/२०२४ दु.३.०१ पर्यत |
| ई निविदाद्वारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या | : | ०३ |
| प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक | : | दि. ३१/०७/२०२४ |
| द्वितीय लिफाफा उघडल्याची दिनांक | : | दि. ०६/०९/२०२४ |
| प्रापत निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससी ने निविदा उघडल्या त्यांची नावे नमुद करावी | : | प्र. शहर अभियंता |

**प्राप्त निविदा समितीपुढे उघडली असुन त्यांचे दर पुढीलप्रमाणे :-**

| **अ. क्र.** | **निविदाकार** | **निविदा दर** |
|---|---|---|
| १ | मे. महेश विजय सातपुते | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | मे. आर. व्ही. धोत्रे कंस्ट्रक्शन | ३.००% जास्त दराने |
| ३ | मे. इरा एंटरप्रायजेस | ७.००% जास्त दराने |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. महेश विजय सातपुते** यांची **अंदाजपत्रकीय** दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. महेश विजय सातपुते** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय** दराची निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहेत.

दि. २६/११/२०२५ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. महेश विजय सातपुते** यांच्या **अंदाजपत्रकीय** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस करणेत आली आहे.

तरी **मे. महेश विजय सातपुते** यांच्या **अंदाजपत्रकीय** दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये मा. स्थायी समिती सभेसमोर संविदा करणेकरीता मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव/निर्णय:-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील **प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १११ मधील नायगांव कोळीवाडा येथे समाजमंदीराचे बांधकाम करणे** कामी प्राप्त निविदांपैकी **मे. महेश विजय सातपुते** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय** दराने निविदा ही सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस तसेच त्याअनुषंगाने होणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सुचकाचे नांव : ------------------------------
व स्वाक्षरी ------------------------------
अनुमोदकाचे नांव : ------------------------------
व स्वाक्षरी ------------------------------

अनुकुल संख्या ________ प्रतिकुल संख्या _________ तटस्थ संख्या _________

ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजुर/नामंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
वसई-विरार शहर महानगरपालिका

* (आवश्यक नसेल ते खोडावे)